आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

५ नोव्हेंबर २1०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- संसदेचं हिवाळी अधिवेशन २५ नोव्हेंबरपासून

- विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्यापासून ४६ हजारांहून अधिक नागरिकांवर प्रतिबंधात्मक कारवाई, २५२ कोटी रुपयांपेक्षा अधिक मालमत्ता जप्त

- वंचित बहुजन आघाडीच्या जाहीरनाम्यात महिला, बेरोजगार, पारलिंगींना दरमहा आर्थिक मदत देण्याचं आश्वासन, घरगुती वापरासाठी २०० युनिट मोफत वीज देणार

- अमेरिकेच्या ४७व्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी मतदानाला सुरुवात

**आणि**

- इफ्फीमध्ये यंदा राज कपूर, तपन सिन्हा, अक्किनेनी नागेश्वर राव आणि मोहम्मद रफी यांचेही चित्रपट दाखवणार

**<><><><><>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला येत्या २५ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. हे अधिवेशन २० डिसेंबरपर्यंत चालवण्यात येईल, अशी माहिती केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरण रिजिजू यांनी आज समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमधून दिली. २६ नोव्हेंबरला भारतीय संविधानाचा स्वीकार करण्याच्या घटनेला ७५ वर्षे पूर्ण होत असून त्याचा अमृतमहोत्सवी सोहळा साजरा केला जाणार असल्याचंही रिजीजू यांनी सांगितलं.

**<><><><><>**

न्यायव्यवस्थेनं निष्पक्ष समाजाच्या दिशेनं देशाची वाटचाल बळकट केली पाहिजे असं मत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केलं.  आज संध्याकाळी राष्ट्रपती

भवनात सर्वोच्च न्यायालयाच्या ३ पुस्तकांचं प्रकाशन केल्यानंतर त्या बोलत होत्या. 'जस्टिस फॉर द नेशन' - सर्वोच्च न्यायालय, भारतातील कारागृहे यांच्या ७५ वर्षांचे प्रतिबिंब - मॅपिंग प्रिझन मॅन्युअल आणि लॉ स्कूलच्या माध्यमातून सुधारणा आणि कायदेशीर मदत - भारतातील कायदेशीर सहाय्य कक्षांच्या कार्याचा अहवाल अशी या ३ पुस्तकांची नावे आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त उद्देशपूर्ण उपक्रमांचं आयोजन करण्यात येत असल्याबद्दल आनंद व्यक्त करताना समान न्याय हा आदर्श न्यायव्यवस्थेसाठी मार्गदर्शक तत्त्व असायला हवं, असं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या.

आज प्रसिद्ध होणाऱ्या सर्व पुस्तकांचं वैशिष्ट्य पारदर्शकता असून वास्तवाचं ज्ञान असल्याशिवाय कायदे आणि धोरणांच्या परिणामांवर मर्यादा येतात असं सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यावेळी बोलताना म्हणाले. तीन पुस्तकांपैकी एक निबंधसंग्रह जो न्यायालयाच्या स्थापनेपासूनच्या न्यायशास्त्राचं विश्लेषण करतो तर उर्वरित दोन विद्यापीठांमधल्या कायदेशीर सहाय्य कक्षांचे कामकाज आणि कारागृहांच्या स्थितीचं मूल्यांकन करणारे अभ्यास आहेत, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठीची आचारसंहिता लागू झाल्यापासून कालपर्यंत एकंदर ४६ हजार ६३० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई केल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिली आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. या कालावधीत राज्यात २५२ कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं.

सी-व्हिजिल ॲपवर प्राप्त झालेल्या तक्रारींपैकी ९९ टक्क्यांपेक्षा जास्त तक्रारी निकाली काढण्यात आल्या. २८८ पैकी १८५ मतदारसंघांमध्ये एक, १०० मतदारसंघांमध्ये दोन, तर ३ मतदारसंघांमध्ये तीन बॅलेट युनिट्स लावण्यात येणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं. मतदानाच्या सुरुवातीला आणि मतदान

संपल्यानंतर मतदान यंत्रांमध्ये किती चार्ज आहे, याची नोंद ठेवण्याच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या मागणीवर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निर्णय घेऊ, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्याच्या पोलीस महासंचालक पदावर आज संजय वर्मा यांची नियुक्ती झाली. ते १९९० च्या तुकडीचे भारतीय पोलीस सेवेचे अधिकारी आहेत. सध्या ते कायदा आणि तंत्रज्ञान विषयक पोलीस महासंचालक म्हणून कार्यरत आहेत. एप्रिल २०२८ मध्ये ते निवृत्त होणार आहेत.

**<><><><><>**

महायुतीच्या जागावाटपानंतरही अपक्ष म्हणून काही उमेदवार उभे राहिले असून त्याबाबत परस्पर सामंजस्याने तोडगा काढू असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी व्यक्त केला. भाजपच्या माजी खासदार हिना गावित यांनी पक्षसदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. गावित यांनी अक्कलकुवा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला आहे. हा मतदारसंघ जागावाटपात शिवसेनेला मिळाला आहे.

**<><><><><>**

विधानसभेच्या निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांनी कोल्हापूरमध्ये आज घेतलेल्या प्रचार सभेत पाच आश्वासन मतदारांना देत महाविकास आघाडीला निवडून देण्याचं आवाहन केलं. महाविकास आघाडीचं सरकार आलं तर शेतीमालाला हमीभाव देण्याचं आश्वासन ठाकरे यांनी दिलं. विद्यार्थींनीबरोबरच विद्यार्थ्यांनाही मोफत शिक्षण दिलं जाईल, महिला पोलिसांची भरती केली जाईल तसंच महिला पोलिस कर्मचारी असलेली पोलिस ठाणी राज्यात सुरू केली जातील. मुंबईतील अदानी प्रकल्प रद्द करुन त्याठिकाणी धारावीकरांना उद्योगधंद्यासकट घरं दिली जातील, जीवनावश्यक वस्तूंच्या दरात कोणतेही बदल करणार नाही. डाळ,

तांदूळ, साखर, तेलासारख्या जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवले जातील, असंही ते म्हणाले. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर प्रत्येक जिल्ह्यात शिवाजी महाराजांचं मंदिर उभारण्याचा पुनरुच्चार ठाकरे यांनी केला.  सुरतमध्येही महाराजांचं मंदिर उभारण्याची इच्छा देखील ठाकरे यांनी व्यक्त केली.  राधानगरी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार के.पी. पाटील यांच्या प्रचारासाठी त्यांनी आज आदमापूर इथं जाहीर सभा घेतली.

<><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज आपल्या पक्षातील ५ नेत्यांवर पक्षविरोधी कारवाया केल्यानं निलंबनाची कारवाई केली. यात माजी आमदार रुपेश म्हात्रे, विश्वास नांदेकर, चंद्रकांत घुगूल, संजय आवारी आणि प्रसाद ठाकरे यांचा समावेश आहे. काल पत्रकार परिषदेत जाहीर केल्यानुसार उमेदवारी अर्ज मागे न घेतल्यानं ही कारवाई करण्यात आली.

<><><><>

जोतिबा, शाहू, बाबासाहेब यांच्या विचारांनी प्रेरित “जोशाबा समतापत्र” हा वंचित बहुजन आघाडीचा विधानसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्याचं प्रकाशन आज प्रकाश आंबेडकर यांच्या हस्ते पुण्यात झालं. महिलांना मासिक ३५०० रुपये वेतन, ४० वर्षापेक्षा जास्त वयाच्या पारलिंगी व्यक्तींना ५ हजार रुपये मासिक वेतन, बेरोजगार सुशिक्षित तरुण तरुणींना २ वर्षापर्यंत ५ हजार रुपये भत्ता, घरगुती वापराची २०० युनिट वीज मोफत आणि ३०० युनिट वीज ज्येष्ठ नागरिकांना मोफत देण्याचं आश्वासन या जाहीरनाम्यात आहे. सर्वांना KG ते PG मोफत शिक्षण,  जात जणगणना करून मंडल आयोगाची शंभर टक्के अंमलबजावणी, बोगस आदिवासींचे दाखले रद्द करणे, हक्काच्या वन जमिनींचे वाटप ही आश्वासनही यात आहेत.

<><><><>

विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसचा जाहीरनामा उद्या प्रसिद्ध होणार आहे. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी उद्या मुंबईत वांद्रे कुर्ला संकुलात त्याचं प्रकाशन होईल. त्यानंतर महाविकास आघाडीच्या महाराष्ट्र स्वाभिमान सभेलाही ते संबोधित करतील. या सभेला पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यांच्यासह महाविकास आघाडीतले प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

या जाहीरनाम्यात आपला पक्ष जनतेला उन्नतीसाठी गॅरंटी देणार आहे. आज विविध क्षेत्रात मागे पडलेल्या महाराष्ट्राला पुन्हा अग्रेसर करण्यासाठी आपण पाच गॅरंटी जनतेसमोर देणार आहोत, असं विजय वडेट्टीवार यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या यवतमाळ जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

अमेरिकेच्या ४७व्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी मतदान होत आहे. रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प आणि डेमोक्रेटिक पक्षाच्या नेत्या कमला हॅरिस यांच्यात लढत होत आहे. निवडणूक प्रचारादरम्यान ट्रम्प यांनी सीमा सील करण्याची ग्वाही दिली असून कोट्यवधी रुपयांच्या करकपातीचा प्रस्ताव दिला आहे तर हॅरिस यांनी गर्भपाताच्या हक्कांची बाजू मांडली आहे आणि कामगार कुटुंबांसाठी अन्न, घरांचा खर्च कमी करण्याचं आश्वासन दिलं आहे. ट्रम्प यांनी

मिशिगनमध्ये भाषण करून प्रचाराचा समारोप केला तर हॅरिस यांनी पेन्सिल्व्हेनिया या राज्यात आपला प्रचार संपवला. फ्लोरिडा विद्यापीठाच्या सर्वेक्षणानुसार आतापर्यंत ८२ दशलक्षांहून अधिक लोकांनी मतदान केलं असून सुमारे २४४ दशलक्ष नोंदणीकृत मतदार आहेत.

<><><><><>

भारताला जगात आशयनिर्मिती आणि निर्यातीचं मोठं केंद्र बनवण्याच्या उद्देशानं पुढच्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात वेव्ह(Waves), अर्थात विश्व दृकश्राव्य आणि मनोरंजन परिषदेचं आयोजन नवी दिल्लीत होणार असल्याची माहिती, माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी आज मुंबईत दिली.

<><><><><>

इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदा राज कपूर, तपन सिन्हा, अक्किनेनी नागेश्वर राव आणि मोहम्मद रफी यांच्या समृद्ध वारशाला आदरांजली वाहण्यासाठी पुनर्संचयित केलेले चित्रपट दाखवण्यात येणार आहेत. यात राज कपूर यांचा आवारा, तपन सिन्हा दिग्दर्शित हार्मोनियम, अक्किनेनी नागेश्वर राव यांचा देवदासू या चित्रपटांचा समावेश आहे. मोहम्मद रफी यांनी गायलेली गीतं समाविष्ट असलेला हम दोनो हा चित्रपट देखील यावेळी दाखवला जाईल. तसंच, या दिग्गजांच्या आठवणींचं प्रदर्शनही या महोत्सवात भरवण्यात येणार आहे.

<><><><><>

उपेक्षित लोकांनी बनवलेल्या उत्पादनांच्या विक्रीसाठी केंद्र सरकार ट्यूलिप ब्रँडची घोषणा आज सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉक्टर वीरेंद्र कुमार यांनी आज नवी दिल्लीत सांगितलं. कुमार यांच्या हस्ते शिल्प समागम मेळावा २०२४ चं उद्घाटन झालं त्यावेळी ते बोलत होते.

//<><><><><>//